Maharashtra Council of Acupuncture
Directorate of Medical Education & Research, Dental College & Hospital Building
4th Floor, St. George's Hospital Campus, P. Dmelo Road, Fort, Mumbai - 400 001
Tel. : 91-22-22620361 / 22652251 / 57 / 59 | Email : mahacucouncil@gmail.com

क्र.अॅक्युपं/नोंदणी/अॅक्यूव्यावसायीक/०१९/२०१९ दि. १७/१२/२०१९

# जाहिर प्रकटन

## अॅक्युपंक्चर व्यावसायिकांना नोंदणी होईपर्यंत व्यवसाय करण्यास मुभा देण्याबाबत

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अॅक्यूपंक्चर चिकित्सा पध्दती अधिनियम, २०१५ अन्वये महाराष्ट्र अॅक्यूपंक्चर परिषदेची निर्मिती केलेली आहे. अधिनियमातील तरतूदीनुसार शासनाने दि २० सप्टेंबर २०१९ च्या राजपत्रान्वये नियम प्रसिध्द केलेले आहेत. परिषदेतर्फे राज्यातील अॅक्युपंक्चर व्यावसायिकांची नोंदणी करण्यासाठी आवश्यक प्राथमिक तयारी पुर्ण झालेली असून लवकरच नोंदणी प्रक्रियेस सुरुवात होत आहे.

आतापर्यंत राज्यात विविध ठिकाणी अॅक्युंपंक्चर व्यावसायिक वर्षानुवर्षे व्यवसाय करीत आहेत. या व्यावसायीकांच्या नोंदणीसाठी आतापर्यंत राज्यात किंवा देशभरात कोणतीही परिषद अस्तीत्वात नव्हती. त्यामुळे या अॅक्यूपंक्चर व्यावसायिकांकडे सध्या कोणत्याही परिषदेची नोंदणी असण्याची शक्यता नाही. परंतू महाराष्ट्र शासनाने आता महाराष्ट्र अॅक्युपंक्चर परिषदेची निर्मिती केलेली असून पुढील सहा महिन्यात पात्र व्यावसायीकांची परिषदेकडे नोंदणी होणे अपेक्षीत आहे.

परिषदेच्या असे निदर्शनांस आणण्यांत आले आहे की, अॅक्युपंक्चर व्यावसायीकांकडे कोणत्याही परिषदेची नोंदणी नसल्यामुळे त्यांना व्यवसाय करण्यास मज्जाव करण्यात येत आहे.

यासंदर्भात असे आवाहन करण्यात येते की, अॅक्युपंक्चर व्यावसायिकांच्या नोंदणीचे काम पूर्ण होईपर्यंत अॅक्युपंक्चर विषयातील प्रमाणपत्र धारण करीत असलेल्या पात्र व्यावसायीकांना पूर्वीप्रमाणे व्यवसाय करण्यास मुभा देण्याची विनंती परिषदेच्या वतीने करण्यांत येत आहे.

आपला विश्वासु,

(डॉ.रुमी बेरामजी)
अध्यक्ष
महाराष्ट्र अॅक्युपंक्चर परिषद,मुंबई

Scanned by CamScanner